

# ‘दिलासा’ - स्त्री अत्याचार निवारण विभाग

कधी हातापायाला जबर दुखापत झाली म्हणून, मुका मार लागला म्हणून किंवा कधी भाजले म्हणून तुम्ही दवाखान्यात येता. काही वेळा कोणतीच शारीरिक दुखापत नसते, पण घरात खाण्या-पिण्याची आबाळ होते, घरातील माणसे नीट बोलत नाहीत, मग मानसिक ताण येतो. साहजिकच झोप न येणे, सतत चक्कर येणे, मासिक पाळीच्या वेळी त्रास होणे अशा तक्रारी सुरु होतात. काही वेळा गोष्टी इतक्या असह्य होतात की जीवनाचा शेवटही करावासा वाटतो.

या सर्वांसाठी तुम्ही जेव्हा दवाखान्यात येता, तेव्हा केस पेपर काढताना तुम्हाला कारणं विचारली जातात. काही जणी ‘नवऱ्याने मारले’ असे सांगतात, त्या आधी काही जणी पोलिस स्टेशनमध्येही गेलेल्या असतात. पण बऱ्याच जणींचे मन ‘नवऱ्याने मारले’ - ‘माहेरच्यांनी मारले’ असे सांगताना कचरते. सासरच्यांनी, घरातल्यांनी कोंडमारा केला असे सांगण्यास त्या धजावत नाहीत. ‘अपघाताने असे झाले’ असे सांगतात.

आता मात्र आपल्या दु:खाला वाट मोकळी करुन देण्यासाठी ‘दिलासा’ विभागाच्या रुपात ह्या हॉस्पिटलमध्ये एक जागा साकारली आहे. ‘दिलासा’ ही या हॉस्पिटल मधील एक ओपीडी आहे. ‘दिलासा’ म्हणजे आधार. येथे येऊन तुम्ही आपली खरी समस्या मांडू शकता, तुमच्याशी बोलायला, कठीण परिस्थितीतून वाट काढायला संवेदनशील तसेच अनुभवी जाणकार असतील. तुम्हाला त्यांचा सल्ला मिळेल. याशिवाय, वकिली सल्ला, पोलिसांची मदत व प्रसंगी एक-दोन दिवसाचा तात्पुरता निवारा यासाठीही ‘दिलासा’ मदत करेल. याच्या जोडीला सरकारने नव्याने केलेल्या कायद्याची माहिती आपल्याला दिलासामध्ये मिळू शकेल.

मुली व स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसा रोखण्यासाठी भारत सरकारने **‘कौटुंबिक हिंसेविरोधी स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा २००५’** अंमलात आणला आहे. तुम्ही कोणत्याही जाती-धर्माच्या असलात तरी तुम्हाला या कायद्याअंतर्गत मदत मिळू शकते. तुमच्यावर सासर-माहेर किंवा इतर जवळचे नातेसंबंध असणाऱ्यांकडून जर हिंसा होत असेल तर तुम्ही या कायद्याची मदत घेऊ शकता. कधी कधी परिस्थिती इतकी बिकट असते की तुम्ही स्वत: दाद मागू शकत नाही तेव्हा इतर कोणीही तुमच्या बाजूने ह्या कायद्याद्वारे दाद मागू शकतात. बऱ्याचदा स्त्रियांना मुख्य भीती असते की, आपल्यावर होणाऱ्या हिंसेविरुद्ध बोलल्यास आपल्या डोक्यावरचे छप्पर जाईल परंतु या कायद्याची मदत घेऊन तुम्ही त्याच घरात राहून तुमच्यावर होणाऱ्या हिंसेला प्रतिबंध करु शकता. आता आपले हात बळकट झाले आहेत कारण या कायद्याचे पाठबळ आपल्याला मिळाले आहे.

प्रत्येकीला हिंसेपासून,मारझोडीपासून, त्रासापासून मुक्त कुटुंब हवे आहे. त्यासाठी ‘दिलासा’ प्रयत्न करत आहे. ‘कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर हिंसा करण्याचा अधिकार नाही’ हेच दिलासाचे ब्रीद आहे. दिलासात आल्याने एकटेपण कमी होऊन तुमचा जगण्याचा आत्मविश्वास वाढावा, यासाठी हा विभाग तत्पर आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खालील 13 सर्वसाधारण रुग्णालयात दिलासा विभाग कार्यरत आहेत**

**के. बी. भाभा रुग्णालय -** ओपीडी नं. 101, लहान मुलांच्या ओपीडी जवळ, आर.के. पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-400 050. ☎ डायरेक्ट : 022-26400229
रुग्णालय : 022-26422541/26422775 विस्ता.-4376 वेळ : सोम-शुक्र, सकाळी 9 ते संध्याकाळी 4 - शनि, सकाळी 9 ते दुपारी 12

**के. बी. भाभा रुग्णालय -** ओपीडी नं. 15, पहिला मजला, बेलग्रामी रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई-400 070.
☎ रुग्णालय : 022-26500241/26500144 वेळ : गुरु-शुक्र, सकाळी 9 ते संध्याकाळी 4 - शनि, सकाळी 9 ते दुपारी 12

**सेठ वि.सी. गांधी व म.ए. वोरा रुग्णालय -** (राजावाडी रुग्णालय), ओपीडी नं. 22, दुसरा मजला, घाटकोपर (पूर्व), मुंबई-400 077.
☎ डायरेक्ट : 022-21020144 रुग्णालय : 022-21025149 विस्ता.-221 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय -** ओपीडी नं.12, आंबेडकर रुग्णालय, टागोर नगर, ग्रुप नं.7, विक्रोळी (पूर्व), मुंबई-400 083.
☎ डायरेक्ट : 022-25770799 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**स्वातंत्र्यवीर सावरकर रुग्णालय -** ओपीडी नं. 22, तळमजला, देशमुख गार्डनच्या मागे, मुलुंड (पूर्व), मुंबई-400 081.
☎ डायरेक्ट : 022-25631125 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**एम. टी. अग्रवाल रुग्णालय -** मेल मेडिकल वॉर्डच्या आत, महाकवी कालिदार रोड, “टी” वॉर्डच्या पाठीमागे, मुलुंड (पश्चिम), मुंबई-400 080.
☎ डायरेक्ट : 022-25601888 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**आर.एन. कूपर रुग्णालय -** लोअर तळमजला, “ई”-2च्या जवळ, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-400 056.
☎ रुग्णालय : 022-26210042 विस्ता.-144 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**पंडित मदनमोहन मालवीय रुग्णालय -** (गोवंडी शताब्दी रुग्णालय), ओपीडी नं.15, दुसरा मजला, गोवंडी, मुंबई.
☎ डायरेक्ट : 022-25500038 ☎ रुग्णालय : 022-25564069 विस्ता.-241 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**वि. एन. देसाई रुग्णालय -** ओपीडी 33 ए, पहिला मजला, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-400 055.
☎ : डायरेक्ट-022-26151507 ☎ रुग्णालय : 022-26183018 विस्ता.341 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**एम. डब्ल्यु. देसाई रुग्णालय -** ओपीडी नं.22, हाजीबापू रोड, गोविंद नगर, मालाड (पूर्व), मुंबई-400 097.
☎ डायरेक्ट : 022-28774216 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केयर रुग्णालय -** ओपीडी नं.122, पहिला मजला, हायवे वर, जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई-400 060. ☎ रुग्णालय : 022-28224081 विस्ता.-211 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय -** (शताब्दी रुग्णालय) ओपीडी नं.7, तळमजला, “ए” विंग, कांदिवली (पश्चिम), मुंबई-400 067.
☎ डायरेक्ट : 022-28647002 ☎ रुग्णालय : 022-28647003 विस्ता.-1046 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले रुग्णालय -** दुसरा मजला, मेन वॉर्डच्या समोर, कस्तुरबा क्रॉस रोड नं.1, बोरीवली (पूर्व), मुंबई-400 066.
☎ डायरेक्ट : 022-28052886 वेळ : सोम-शनि, सकाळी 9 ते संध्याकाळी 4

**दिलासा तुमच्यासाठी सुरक्षित जागा आहे.**